# एकात्मिक बाल-विकास सेवा योजना
# प्रकल्प - मोहोळ
# जि.सोलापूर ता.मोहोळ

## अनुक्रमणिका


| अ.क्र | लेखन मुद्दे | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | नवोपक्रम शीर्षक | १ |
| २ | स्पर्धक सेविका माहिती | २ |
| ३ | माझी अंगणवाडी बोलकी अंगणवाडी उपक्रम माहिती | ३ |
| ४ | नवोपक्रम गरज व महत्व | ४ व ५ |
| ५ | नवोपक्रम उद्दिष्टये | ६ |
| ६ | नवोपक्रम नियोजन | ७ |
| ७ | नवोपक्रम कार्यपध्दती | ८ व ९ |
| ८ | नवोपक्रम यशस्विता व फलनिष्पती | १० |
| ९ | समारोप | ११ |
| १० | संदर्भ सूची | १२ |
| ११ | सोबत फोटो जोडले आहेत | १३ व १४ |
| १२ | प्रतिज्ञापत्र व प्रमाणपत्र | १५ |

# एकात्मिक बाल-विकास सेवा योजना
# प्रकल्प - मोहोळ

*** माझी अंगणवाडी बोलकी अंगणवाडी ***

ए.बा.वि. सेवा योजना, मोहोळ

- अंगणवाडी -

ता.मोहोळ जि.सोलापूर

**- अंगणवाडी सेविका -**
**श्रीमती - रशिदा अब्दूल शेख**
**बुधवार पेठ, मोहोळ**

*** नवोपक्रम ***
**माझी अंगणवाडी बोलकी अंगणवाडी**

*** स्पर्धेचा गट ***
**पूर्व प्राथमिक शिक्षण अंगणवाडी**

## * स्पर्धक सेविका माहिती *



- नाव:- श्रीमती. रशिदा अब्दूल शेख
- शिक्षण :- B.A. M.S.C.I.T
- जन्म तारीख :- २३/१/१९६७
- मोबाईल नं:- ८०८७५६३५५०
- पत्ता :- बुधवार पेठ, मोहोळ ता.मोहोळ जि.सोलापूर
- अंगणवाडी केंद्र :- बाजारतळ क्र.६
- सेवा कालावधी :- २२ वर्षे
- अंगणवाडीचा पत्ता :- आठवडा बाजार, मोहोळ.
- Email :- rashidashaikh८०८७@gmail.com
- My YouTube Channel Name :- Rashida Kurulkar Vlogs
- YouTube Link :- https://youtube.com/watch?v=ravmGNakbMU&feature=share

## * माझा नवोपक्रम :-

## * माझी अंगणवाडी बोलकी अंगणवाडी *

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प मोहोळ या ठिकाणी अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत असून मी माझ्या नवोपक्रमातून माझ्या छोटयाशा बालकांचा सर्वांगीण विकास कसा होईल या कडे लक्ष केंद्रित करुन, ही छोटी बालके अंगणवाडीत रममाण व्हावीत, त्यांना आनंद मिळावा, त्यांच्या कल्पना शक्तीला वाव मिळावा, त्यांचा भाषा विकास व्हावा, बालकांची आंगणवाडीत पूर्वशालेय शिक्षणाची तयारी ही चांगली झालीच पाहिजे.

त्यांचा पाया भक्कम झाला पाहिजे, पाटी-दफ्तर विना ३ ते ६ वयोगटातील बालक अगदी आनंदाने शिकला पाहिजे - टिकला पाहिजे व पूढे प्राथमिक शाळेत ही टिकला पाहिजे या हेतूने मी नवोपक्रम **'माझी अंगणवाडी बोलकी अंगणवाडी'** निवडला आहे.

थोडक्यात अंगणवाडी ही एक बाग आहे. त्या बागेतील रोपटी ही ३ ते ६ वयोगटातील बालके आहेत आणि त्या बागेतील माळी म्हणजे मी अंगणवाडी सेविका आहे. त्यांना चांगल्या पध्दतीने स्वत:पानी घालून योग्य अशी वाढ करणे हे माझं कर्तव्य म्हणून हा नवोपक्रम निवडला आहे.

## * नवोपक्रम - गरज व महत्व *

३ ते ६ वर्षे वयोगट असा आहे की या वयातच आपण जे मुलांना शिकवू जे संस्कार घडवू तेच पुढील प्रगतीसाठी, आयुष्यासाठी फार उपयुक्त आहे आणि त्यांचा पाया भक्कम करण्यासाठी ३ ते ६ वर्षे वयोगट खूप महत्वाचे आहे.

बालकांची लहान वयातच मनाची जडण - घडण, बुध्दीची वाढ सहा वर्षे वयापर्यंत होत असते. बुध्दीची वाढ व विकास झपाट्याने घेण्यासाठी योग्य असं शिक्षण या वयातच मिळालं पाहिजे.

म्हणूनच मला या नवोपक्रमातून बालकांना विविध गोष्टी - विविध विषयाची जाणीव या नवोपक्रमाच्या माध्यमातून त्यांचा प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत करणे सहज शक्य होईल.

माझ्या या नवोपक्रमातून ही बालके अंगणवाडीत येताच ते रममाण होतील, आनंदी होतील, आणि ते फक्त निरीक्षण करुन पाहून बोलू लागतील आणि हे काय? ते काय ? असा प्रश्न पडेल ? त्यांना त्यांना अक्षरांची, अंकाची, पशू - पक्षी -फळे, प्राणी ओळख होईल. स्वत: कल्पना करु लागतील त्यांचा उत्साह वाढेल. मुले माझी 'बोलक्या भिंती बरोबर बोलू लागतील, हसू लागतील, खेळू लागतील.

वाचन, लेखन, गणन हे परिचयाचे नसताना ही हे आपसूकच या मार्गाने शिकत जातील म्हणून हा माझा छोटासा प्रयत्न !

## * नवोपक्रमाचे महत्व *

* मी माझी अंगणवाडी बोलकी केल्यामूळे मूलांना दररोज अंगणवाडीत येण्याची आवड निर्माण झाली.

* माझी अंगणवाडी रंग-रंगोटी, पाने-फुले,प्राणी, फळे, पक्षी, अंक, भाज्या, अक्षर यांची भिंती भरलेल्या असल्याने भिंती माझ्या बालकांशी बोलू लागल्या.

* पालकांचा सहभाग वाढला.

* मुलांना घेऊन पालक अंगणवाडीत येऊ लागली.

* लोकसहभाग आणखी वाढला.

* मुलांची एकाग्रता व निरीक्षण शक्ती वाढली.

* मुले ८ ते १२ या वेळेत बसू लागली.

* प्रत्येक मुलं बोलू लागल.

* त्यांचा संवाद वाढला.

* पालकांचा अंगणवाडी केंद्र हे फक्त उपहार वाटप केंद्र नसून याठिकाणी ही आमचं मुलं शिकतं याची जाणीव करुन देणे.

## * नवोपक्रमाचे उद्दिष्टे *

* बालकांचा सर्वांगीण विकास करणे.

* शाळा गळतीचे प्रमाण कमी करणे.

*पूर्व प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम करणे.

* प्रत्येक बालक सुदृढ - स्मार्ट झाला पाहिजे.

* बालक शाळेत वाचन, लेखन, गणन प्रत्यक्षात येत नाही तरी त्या विविध कौशल्यांच्या माध्यमातून आत्मसात करणे.

* नवोपक्रमातून बोलक्या भिंतीतून एखादे चित्र पाहून त्यावरुन गोष्ट सांगता येते, अंक वाचन होते.

* बोलक्या भिंतीच्या आधारे कृत्रियूक्त गीत म्हणता येते.

* बोलक्या भिंतीच्या आधारे पक्षी, प्राणी व इतर गोष्टी सांगता येतात.

* मुले एकाग्र होऊन ऐकतात, करतात.

* शब्द संग्रह वाढतो, भाषा विकास होते.

*बौध्दीक विकास होतो.

* हसत- खेळत शिक्षण मुलांना मिळते.

ही छोटी बालके शब्दांची संपत्ती आहे. देशाचे भवितव्य म्हणजे ही बालके यांचा पाया भक्कम करणे समाज, शिक्षक, पालक म्हणून हा माझ‍ा छोटासा प्रयत्न.

मी केलेला हा नवोपक्रम म्हणजे बोलकी अंगणवाडी हे सर्व सेविकांसाठी नक्कीच उपयुक्त ठरेल, आपल्या सर्वांना प्रेरणा मिळेल नक्कीच !

## * नवोपक्रमाचे नियोजन *

**'माझी अंगणवाडी बोलकी अंगणवाडी'** या नावातच खुप काही दडलेलं आहे.

माझी अंगणवाडीत पूर्वी रंग - रंगोटी नव्हती, निर्जीव भिंती होत्या आणि प्रसन्न असे वातावरण नव्हते.

अंगणवाडीत बालकांना या पेक्षाही प्रभावी व सोप्या माध्यमाचा वापर करुन शिकवले पाहिजे, असे माझ्या लक्षात आले.

म्हणून मी एक असा नवोपक्रम निवडला की जिथे मुलांचा बौध्दीक, भाषा, शारिरीक, सामाजिक असा सर्वांगीन विकास होईल म्हणून मी माझा नवोपक्रम निवडला- **'माझी अंगणवाडी बोलकी अंगणवाडी'.**

माझ्या या नवोपक्रमाला दिशा मिळाली आणि लोक सहभागातून माझी अंगणवाडी बोलकी झाली.

अंगणवाडी क्षेत्रातील पालक, प्रतिष्ठीत व्यक्ती तसेच शाळेचे मुख्याध्यापक मा. पठाण सर, यांचे मार्गदर्शन घेऊन मी माझी अंगणवाडी बोलकी केली. प्रत्येक भिंत माझ्या मुलांशी बोलते, हसते, खेळेते.

त्याचप्रमाणे भिंतीवर विविध म्हणीचा वापर केला व पालकांना जागृत करत आहे.

तर भिंतच बोलकी केली तर नक्कीच आपले मुले बोलकी होतील हे लक्षात आले. रंगांची नावे, फळांची, फुलांची, प्राण्यांची, पक्षांची नावे चव ओळखणे, अक्षर ओळख, लहान,मोठा, झाडे लावणे, चांगल्या सवयी म्हणजेच एकंदरीत बोलक्या भिंती केल्याने आपण कृतीतुन अभिनयातुन गोष्टीतुन गप्पा मारत या लहान मुलांना शिकवू शकतो हे या नवोपक्रमाचे नियोजन.

# * नवोपक्रमाचे कार्यपध्दती *

## *पुर्व स्थितीचे निरीक्षण

बाल्यावस्था ही विकासाच्या अवस्थामधील अत्यंत महत्वाची अवस्था आहे. या अवस्थेत मुलांची वाढ व विकास झपाटयाने होत असते. त्यांच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक ती कौशल्य विकसीत होण्यासाठी **माझी अंगणवाडी बोलकी अंगणवाडी** करण्याचा हा प्रयत्न.

* पुर्वी मुले जास्त बोलत नव्हती, बोलायला घाबरत होती.

* पालकांना अंगणवाडी म्हणजे आहार वाटप केंद्र वाटत होते.

* मुलांची उपस्थिती कमी असायची.

* मुले अंगणवाडीत ८ ते १२ या वेळेत बसत नव्हती.

* पालकांनाही अंगणवाडीत मुलांना काळजीने पाठवावे असा उत्साह नव्हता.

* पालकांचे अंगणवाडीत येण्याचे प्रमाण कमी होते.

* अंगणवाडीत पूर्वशालेय शिक्षण काय असते हे पालकांना माहीत नव्हते.

* बालकांना उपजतच खुप कौशल्य अंगी असतात पण त्यांना योग्यवेळी योग्य शिक्षण मिळणे आवश्यक असते.

* हाच माझा नवोपक्रमाचा हेतू होता आणि आहे.

## *कार्यवाही दरम्यान निरीक्षण*

* जेव्हा माझी अंगणवाडी रंगरंगोटी करुन विविध चित्रांच्या माध्यमातुन रेखाटली गेली माझी अंगणवाडी बोलकी झाली.

*मुलांना प्रसन्न वाटू लागले.

* मुलांची उपस्थिती वाढली, पट वाढला.

* मुलांना अंगणवाडीत बसण्याची सवय लागली.

*मला बोलक्या भिंतीचा आधार घेऊन मुलांना शिकविणे सोपे वाटू लागले.

* मुले रममाण झाली.

*बोलक्या भिंतीच्या माध्यमातुन अंक ज्ञान अक्षर ओळख प्राणी, पक्षी,फुले अशा विविध गोष्टीची ओळख झाली.

* मुलांचा भाषा, बौध्दीक, भावनिक असा सर्वांगिण विकास झाला.

* प्रत्येक मुल बोलु लागले.

* पालकांचा सहभाग, पालकांचा संवाद वाढला.

* पालक मुलांना सोडवायला अंगणवाडीत येऊ लागले.

* मुले घरी आई-वडीलांना अंगणवाडीत शिकवलेले म्हणुन दाखवू लागले पालक खुश झाले.

* लोकसहभाग वाढल्याने इतर ही साहित्य माझ्या अंगणवाडीत वाढले.

* अंगणवाडीच्या माध्यमातुन ज्या सेवा दिल्या जातात त्या लोका पर्यंत पोहोचवणे सोपे झाले.

**थोडक्यात माझा नवोपक्रम यशस्वी झाला.**

## * नवोपक्रमाची यशस्विता *

**'माझी अंगणवाडी बोलकी अंगणवाडी'** या नवोपक्रमाच्या माध्यमातुन मला मुलांना चांगले शिकवता येऊ लागले, मुले माझी बोलकी, हसरी आणि स्मार्ट झाली.

जशी माझी अंगणवाडी बोलकी झाली तसेच माझ्या अंगणवाडीतील प्रत्येक मुल बोलकं झालं.

अंगणवाडीच्या माध्यमातुन ज्या सहा सेवा दिल्या जातात त्या लोकांपर्यंत पोहोचल्या जात आहेत.

पालकांचा अंगणवाडीत येण्याचा अडीअडचणी समजुन घेण्याचा, मुलांची काळजी घेण्याचा दृष्टीकोनात वृध्दी झाली.मला प्रेरणा मिळाली, प्रोत्साहन वाढले, माझा नवोपक्रम यशस्वी झाला.

* बालकामध्ये, पालकांमध्ये आणि माझ्यामध्ये ही आत्मविश्वास वाढला.

* बालक - पालक - शिक्षक असा समन्वय साधला गेला.

* हा नवोपक्रम बालकांचे विविध कौशल्य विकसित करण्यास उपयुक्त ठरला.

* हा नवोपक्रम इतर अंगणवाडी सेविका व बालकांसाठी सोपा व सोईस्कर आहे.

## * समारोप *

माझ्या अंगणवाडीतील बालकांसाठी घेतलेला नवोपक्रम नक्कीच बालकांच्या सर्वांगिन विकासाच्या दृष्टीने मला उपयुक्त ठरला. मी या नवोपक्रमातुन स्वत:ला सिध्द करु शकले. माझी अंगणवाडी I.S.O मानांकन प्राप्त झाली. मला आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्कार मिळाला.

या उपक्रमासाठी मार्गदर्शक ठरलेले शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री.हमीदखाँ पठाण सर, पर्यवेक्षिका रजनी सरडगीकर तसेच मदत करणारे पालक वर्ग व माझ्या बरोबर काम करणारी अंगणवाडीतील मदतनीस स्वाती तेली या सर्वांचे मनपुर्वक आभार.

माझ्या नवोपक्रमात मोलाची साथ देणारी दररोज नित्य नियमाने अंगणवाडीत येणारे हे छोटी निरागस बालके आणि पालक यांच्यामुळेच हा उपक्रम साध्य व सिध्द करु शकले मनस्वी आभार !

**** धन्यवाद ****

## * संदर्भ सूची *

* या नवोपक्रमासाठी आकार बालशिक्षणक्रम पुस्तिका.

* अंगणवाडी सेविकांसाठीची हस्त पुस्तिका.

* अंगणवाडी शिक्षिका प्रशिक्षण.

* गोष्टी सांगणार यासाठी चार गोष्टी - ताराबाई मोडक

* क्रांतीवीर सावित्रीबाई ज्योतीबा फुले - प्रथम शिक्षिका यांचाआदर्श यांनी केलेल शैक्षिणिक कार्य डोळया समोर ठेवून माझा हा नवोपक्रम

नवीन पिढी घडविण्याचा छोटासा प्रयत्न.

**** बालकांचा विकास देशाचा विकास ****

**** धन्यवाद ****

# * माझी अंगणवाडी बोलकी अंगणवाडी *








# * माझी अंगणवाडी बोलकी अंगणवाडी *



